दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक सागर राणा अभोरे   संपादक बडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788

वाशीम ■ शनिवार दि. 06 ऑगस्ट 2025 ■ वर्ष : 2 रे ■ अंक : 120 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## प्रशिक सहकारी पत संस्था व्यवस्थापक आणि कर्मचारी दोन दिवस निलंबित सहाय्यक निबंधक कार्यालयात दिवसभर उपस्थित राहण्याचा आदेश.

### निवडणूक प्रचारचा शेवटचा दिवस सहकार पॅनल ची विजायाकडे घोडदौड...


### पराजयांच्या भीतीनी सत्तादाऱ्याच्या सेटिंगची समाज माध्यमात चर्चा...

### वारेमाफ जाहिरात खर्च, पेड बातम्या आणि मतदारांना अमिषा चा भडीमार...

महाराष्ट्र जीत

कारंजा /निवडणूक प्रतिनिधी

तालुक्यातील सहकार क्षेत्रात नावाजलेल्या प्रशिक सहकारी पत संस्थेच्या निवडणूकीचा आज शेवटचा दिवस हीं आरोप प्रात्यरोपाने गजला.. सत्ताधारी विकास पॅनल च्या माजी अध्यक्ष आणि संचालकांना प्रचारादम्यान व्यवास्थाक आणि कर्मचारी यांनी प्रचारात उतरविल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यवाहीला सामोरे जावे लागले त्यात संस्थेच्या व्यवस्थाक आशा राऊत यांचेवर दोन दिवसाच्या निलंबनाची कार्यवाही हीं सहकार पॅनल च्या यश मानल्या जात असून आज दिवसे अखेर सहकार पॅनल चे भावराव वासनिक सागर अभोरे, येशुराज डेंडुले, मनोज मेश्राम यांनी बँकेच्या व्यवस्थापक आशा राऊत आणि सर्व कर्मचाऱ्यांचा दोन दिवस काम बंद करून सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालयात हजेर ठेवण्यात म्हणजेच कर्मचाऱ्याच्या दोन दिवस निलंबाच्या आदेशा नंतर कार्यालय सोडले त्यामुळे सहकार पॅनलच्या यां उमेदवाराची जोरदार चर्चा समाज माध्यमात रंगली. आज प्रचाराच्या शेवटच्या दिवशी दुपारी सहाय्यक निबंधक कार्यालयात पत संस्थेचे व्यवस्थापक आशा राऊत आणि कर्मचारी निवडणूक प्रचारात आढडून आल्याने त्याच्यावर कार्यवाहिची कुऱ्हाड चालवावी लागली ऱ्यांसाठी सहकार पॅनलचे सागर अंभोरे यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याने आजचा दिवस शेवटचा दिवस प्रचंड गाजला. सताधारी पॅनलचे रवी रामटेके आणि सागर अंभोरे याचे वाकयुद्ध आज समाज मध्यनात चर्चेचा विषय ठरले त्यात संबंधितावर झालेल्या कार्यवाहीने सत्ताधारी पॅनल च्या वॉरिमाफ खर्चा ची चर्चा त्यांनी पेपर जाहिरात पेड न्यूज आदीची चर्चा मतदारांना मिळते असलेली आमिष यावर मिस्थांग चर्चा पाहायला मिळाली . त्यामुळे सत्तेत काहीही करून राहण्यासाठी सत्तधाऱ्याची सर्टींग होत असल्याचे मतदार खुलेआम बोलत असल्याचे दिसते


महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

कार्यालय, सहाय्यक निबंधक , सहकारी संस्था, कारंजा
नगर परिषद कॉलनी, उपजिल्हा रुग्णालयाचे मागे, ता. कारंजा जि. वाशिम
दूरध्वनी क्र.-07256-22206 ई-मेल – arcskrj_wsm@rediffmail.com

जा.क्र.-सनिका/निवडणूक/ २८ /२०२५   दिनांक :- ५/९/२०२५

प्रति,
व्यवस्थापक,
प्रशिक ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. कारंजा लाड,

विषय :- सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कारंजा या कार्यालयात निवडणुक प्रक्रिया पुर्ण होईपर्यत उपस्थित राहणे बाबत.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषगाने आपणास सुचित करण्यात येते की, प्रशिक ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. कारंजा लाड, जि. वाशिम या संस्थेची निवडणुक प्रक्रिया पुर्ण होईपर्यत दोन दिवस सर्व कर्मचा-यांनी या निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहावे व रिकरींग एजंट यांनी निवडणुक कालावधीत रिकरींग काम करु नये तसेच कोणत्याच प्रकारचा निवडणुक प्रचार करुन नये व आचार संहितेचे पालन करावे. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

निवडणुक निर्णय अधिकारी
प्रशिक ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.
कारंजा र.न. ७६० ता. कारंजा जि. वाशिम

# सीएसएमटी-पनवेल, ठाणे-पनवेल लोकल सेवा रद्द;

## रविवारी मध्य, पश्चिम रेल्वेवर मेगाब्लॉक

मुंबई : मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील आणि पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल विभागातील विविध अभियांत्रिकी व देखभाल कामासाठी रविवारी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेवरील मेगाब्लॉकमुळे मुख्य मार्गावरील लोकल सेवा विस्कळीत होण्याची शक्यता आहे. तर, हार्बर मार्गावरील सीएसएमटी – पनवेल आणि ठाणे – पनवेल लोकल सेवा रद्द करण्यात येणार आहे. ब्लॉकमुळे पश्चिम रेल्वेवरील काही लोकल सेवा रद्द करण्यात येतील.

मध्य रेल्वे

मुख्य मार्ग

कुठे : माटुंगा – मुलुंड स्थानकांदरम्यान अप व डाऊन जलद मार्गावर

कधी : सकाळी ११.०५ पासून ते दुपारी ३.४५ पर्यंत

जलद लोकल, माटुंगा स्थानकापासून मुलुंडदरम्यान डाऊन धिम्या मार्गावर वळविण्यात येतील. या लोकल त्यांच्या नियोजित थांब्यांवर थांबून त्या त्यांच्या इच्छितस्थानकात अंदाजे १५ मिनिटे उशिरा पोहोचतील. ठाण्यानंतरच्या जलद लोकल मुलुंड स्थानकापासून पुन्हा डाऊन जलद मार्गावर वळविण्यात येतील. ठाणे येथून सकाळी ११.०३ पासून दुपारी ३.३८ पर्यंत सुटणाऱ्या अप जलद लोकल मुलुंड स्थानकापासून माटुंगादरम्यान अप धिम्या मार्गावर वळविण्यात येतील व त्यांच्या नियोजित थांब्यांवर थांबून या लोकल माटुंगा स्थानकापासून पुन्हा अप जलद मार्गावर वळविण्यात येतील. या लोकल इच्छित स्थानकात अंदाजे १५ मिनिटे उशिरा पोहोचतील.



काळाघोडा–ओशिवरा प्रवास ७०० रुपयांऐवजी केवळ ५० रुपयांमध्ये; मुंबईकर, पर्यटकांना परवडणारा बेस्टचा नवीन मार्ग सेवेत

हार्बर मार्ग

कुठे : पनवेल – वाशी अप व डाऊन मार्गावर (पोर्ट मार्गिका वगळून)

कधी : सकाळी ११.०५ पासून ते दुपारी ४.०५ पर्यंत

परिणाम : पनवेल येथून सकाळी १०.३३ पासून दुपारी ३.४९ पर्यंत सुटणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणाऱ्या अप हार्बर मार्गावरील लोकल, तसेच, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सकाळी ९.४५ पासून दुपारी ३.१२ पर्यंत सुटणाऱ्या पनवेल / बेलापूरकडे जाणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील लोकल रद्द करण्यात येणार आहेत. पनवेल येथून सकाळी ११.०२ पासून ते दुपारी ३.५३ पर्यंत सुटणाऱ्या व ठाण्याकडे जाणाऱ्या अप ट्रान्सहार्बर मार्गावरील लोकल, तसेच, ठाणे येथून सकाळी १०.०१ पासून दुपारी ३.२० पर्यंत सुटणाऱ्या पनवेलकडे जाणाऱ्या डाऊन ट्रान्स हार्बर मार्गावरील लोकल रद्द करण्यात येणार आहेत. ब्लॉकच्या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – वाशीदरम्यान विशेष लोकल चालविण्यात येणार आहेत. ब्लॉक कालावधीत ठाणे – वाशी/नेरुळ स्थानकांदरम्यान ट्रान्सहार्बर मार्गावर लोकल सेवा उपलब्ध असेल. ब्लॉक कालावधीत पोर्ट मार्गावरील सेवा उपलब्ध असेल.

कुठे : सांताक्रूझ – गोरेगाव स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावर

कधी : रविवारी सकाळी १० ते दुपारी ३ दरम्यान

परिणाम : ब्लॉक कालावधीत सर्व जलद मार्गावरील लोकल गोरेगाव – सांताक्रूझ स्थानकांदरम्यान धीम्या मार्गावर चालवण्यात येतील. त्यामुळे काही लोकल रद्द करण्यात येतील. तर, काही अंधेरी आणि बोरिवली लोकल हार्बर मार्गावरून गोरेगावपर्यंत चालवण्यात येतील.

